PRAHLADRAI DALMIA LIONS COLLEGE
OF COMMERCE & ECONOMICS
(Government Aided & Affiliated to University of Mumbai & AICTE, New Delhi)
(Government Approved Hindi Linguistic Minority) (UDISE No. : 27230600231)
NAAC Re-accredited with 'A' Grade (III Cycle) ISO 21001 : 2018 Certified
University of Mumbai Recognized Research Centre in Accountancy, Commerce & Business Economics
॥ व्यापारेय सेवा ॥
Estd. 1972

Ref. No. ______________ Date : ______________

Date: 11-8-2026

# NOTICE

## MAHADBT 2.0 SCHOLARSHIP 2026-2027

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० पोर्टलवर अर्ज करावेत. सन २०२६–२७ या वर्षातील विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर पर्यंत अर्जाची पूर्तता करावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयालार्फत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता या योजना राबविण्यात येतात. या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी २२ जुन २०२६ पासून ऑनलाईन महाडिबीटी पोर्टल सुरु झालेले आहे. तरी महाविद्यालयातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती साठी अर्ज भरावेत.

महाविद्यालयातील प्रवेशीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर जाऊन शिष्यवृत्ती अर्ज भरावेत. त्या अर्जाची छायांकीत प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयात कार्यालय काउंटर नंबर ९ वर सादर करावी. कागदपत्रे सबमिट केल्याशिवाय फॉर्मची पडताळणी होणार नाही आणि तो संबंधित विभागाकडेही पाठवला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सोबत परिशिष्ट "अ" मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाचा नमूना जोडलेला आहे.

11/08/2026

प्रो. डॉ. दिगंबर एन. गंजेवार
प्राचार्य

PRINCIPAL
PRAHLADRAI DALMIA LIONS COLLEGE OF
COMMERCE AND ECONOMICS
SUNDER NAGAR, MALAD (W),
MUMBAI - 400 064.



Scanned with CamScanner

राज्यातील मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजनांची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यासाठी MahaDBT Portal वर महाआयटीद्वारे विकसित “महाशिष्यवृत्ती” एकात्मिक संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती-२०२५/प्र.क्र.१३३/शिक्षण-१
दिनांक : २३ मे, २०२६

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभागाचे क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०६/समन्वय-२ दि.०८.०१.२०२६ रोजीचे पत्र

२) या विभागाचे महाआयटीस पाठविलेले पत्र क्र.शिवृत्ती-२०२५/प्र.क्र.६४/ शिक्षण-१, दि.२१.०१.२०२६

प्रस्तावना :

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजना MahaDBT प्रणालीद्वारे राबविण्यात येतात. सद्यस्थितीत शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व विद्यार्थीकेंद्रित होण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजनांचे मा. मुख्यमंत्री कार्यालयाच्या निर्देशानुसार सर्व संबंधित विभागांतर्गत अभ्यासगटामार्फत Governance Process Re-Engineering करण्यात आले आहे.

सदर Governance Process Re-Engineering अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०८.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये या विभागास प्राप्त झाला होता. सदर GPR अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार आवश्यक प्रणाली विकास व अंमलबजावणीची कार्यवाही करण्याकरीता व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी यांना या विभागामार्फत दि.२१.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला होता. त्यानुषंगाने महाआयटीद्वारे विकसित “महाशिष्यवृत्ती”

एकात्मिक संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याची बाब विभागाच्या विचाराधीन होती. त्यानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय :**

राज्यातील सर्व मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून "महाशिष्यवृत्ती" या एकात्मिक संगणकीय प्रणालीद्वारे MahaDBT २.० पोर्टलवर राबविण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने या विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या व अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या इमाव, विजाभज व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजनांसाठी सदर MahaDBT २.० पोर्टलवरील "महाशिष्यवृत्ती" एकात्मिक संगणकीय प्रणाली याद्वारे लागू करण्यात येत आहे.

२. "महाशिष्यवृत्ती" एकात्मिक संगणकीय प्रणालीमुळे विविध विभागांतील योजना एकाच डिजिटल पोर्टलवर (Digital Portal) एकत्रित उपलब्ध होऊन योजनांची अंमलबजावणीची प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी सुलभ व सुसंगत होईल.

३. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे ते ज्या योजनांसाठी संभाव्यतः पात्र असू शकतात अशा योजनांची माहिती पाहण्याची सुविधा त्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना योजनांसाठी अर्ज करताना माहितीपूर्ण व पारदर्शक पद्धतीने निर्णय घेणे सुलभ होईल. यामुळे अपात्र अर्जांचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊन संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया अधिक कार्यक्षम, पारदर्शक व विद्यार्थी-केंद्रित होईल.

४. विद्यमान ऑनलाईन प्रणालीमधील १३० पेक्षा अधिक अर्ज माहिती क्षेत्रांचे (Application Fields) योजनानिहाय भरावे लागतात. या प्रणालीमुळे सदर Fields ची संख्या कमी करुन ती ६५ क्षेत्रांपर्यंत मर्यादीत करण्यात आली आहे.

५. तसेच विद्यार्थ्यांना सादर करावी लागणारी कागदपत्रांची संख्या कमी करण्यात आल्याने त्यांना पुनरावृत्ती स्वरूपातील माहिती भरणे व कागदपत्रे सादर करणे टाळण्यासाठी आधार, CET Cell ई. शासकीय डेटाबेसमधून माहिती व कागदपत्रांचे Auto-Fetch लागू करण्यात येत आहे.

६. तसेच विद्यमान चार-स्तरीय छाननी यंत्रणा सुलभ करून सरासरी दोन छाननी स्तरांपर्यंत मर्यादित करण्यात येत असून, त्यामुळे अर्जांची छाननी व मंजुरी प्रक्रीया जलदगतीने करणे शक्य होणार आहे.

७. शिष्यवृत्ती नूतनीकरण प्रक्रियादेखील Pre-filled Renewal Application द्वारे सुलभ करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना केवळ शुल्क भरण्याचा तपशील व इतर बदल झालेली माहिती अद्ययावत करावी लागेल.

८.	उत्पन्नाधारित योजनांसाठी प्रथम वर्षी सादर करण्यात आलेले उत्पन्न प्रमाणपत्र तसेच, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क या योजनांसाठी प्रथम वर्षी सादर करण्यात आलेले नॉन-क्रिमिलेयेर प्रमाणपत्र स्वयंघोषणापत्राच्या (Self Declaration) आधारे संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीसाठी वैध राहील.

९.	विद्यार्थ्यास त्याच्या अर्जाची स्थिती (Status) वेळोवेळी ऑनलाइन पाहता येईल अथवा तपासता येईल.

१०.	शिष्यवृत्तीच्या रकमेचे(परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता) वितरण (Disbursement) विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यावर थेट ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात येईल.

११.	सदर शासन निर्णयाद्वारे "महाशिष्यवृत्ती" ही एकात्मिक संगणकीय प्रणाली MahaDBT २.० पोर्टलवर लागू करण्यात येत असली, तरीही संबंधीत शिष्यवृत्ती योजनांच्या मूळ शासन निर्णयांद्वारे निर्धारीत करण्यात आलेल्या अटी, शर्ती, पात्रता निकष, आर्थिक मर्यादा, लाभांचे स्वरूप व अंमलबजावणीची मूलभूत तत्वे कायम राहतील.

१२.	प्रस्तुत प्रणाली ही अर्ज भरणे, अर्ज तपासणे (Scrutiny), शिष्यवृत्ती मंजुरी, शिष्यवृत्तीच्या रकमेचे हस्तांतरण व अर्जाचे नूतनीकरण प्रक्रिया इ. बाबी सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यासाठी तांत्रिक व प्रशासकीय सुधारणा म्हणून लागू करण्यात येत आहे.

१३.	मॅट्रिकोत्तर (Post-Matric) योजनांच्या शासन निर्णयांमध्ये वेळोवेळी करण्यात आलेले सुधारित बदल, शुद्धीपत्रके, परिपत्रके व पूरक सूचना यानुसार "महाशिष्यवृत्ती" संगणकीय प्रणालीत महाआयटीने वेळोवेळी बदल करणे आवश्यक राहील.

१४.	सदर महाशिष्यवृत्ती प्रणालीमार्फत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची कार्यपद्धती www. mahadbt२.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील युजर मॅन्युअलमध्ये सविस्तरपणे देण्यात आलेली आहे. तसेच विविध योजनांचे निकष, पात्रता व शिष्यवृत्ती लाभाचा तपशील देखील याच संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

१५. सदर प्रणाली या विभागाच्या पुढील ११ मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजनांसाठी लागू राहील:-

| | |
|---|---|
| १ | इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती |
| २ | विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती |
| ३ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन |
| ४ | व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना |

| | |
|---|---|
| ५ | विमाप्र या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती |
| ६ | इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या व १२ वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्तापूर्ण शिष्यवृत्ती |
| ७ | विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काचे व परीक्षा शुल्काचे प्रदान |
| ८ | इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काचे व परीक्षा शुल्काचे प्रदान |
| ९ | विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काचे व परीक्षा शुल्काचे प्रदान |
| १० | व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या इमाव प्रवर्गातील मुलींना परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्काचे प्रदाने |
| ११ | व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्या |

१६. या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाचा नमूना जोडला आहे.

१७. उपरोक्त सर्व सुधारणा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अंमलात येतील. त्यानुषंगाने या विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५२३१३१५१४३२३४ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
Date: 2026.05.23 03:07:09 -07'00'

**(रुपाली कबरे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**


सोबत : परिशिष्ट - अ

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (अल्पसंख्याक विकास व औफाक विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, इतर मागास बहुन कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव
६. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

७. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१०. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
११. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१२. सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
१४. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१५. व्यवस्थापकीय संचालक,महाआयटी, मुंबई.
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७. सर्व प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग
१८. सर्व जिल्हा सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२०. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४. निवडनस्ती/शिक्षण-१

## परिशिष्ट “अ”
## मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाचा नमूना



**Applicant Details**

**Applicant Personal Details**

Aadhaar Number * : XXXXXXXX7806

Aadhaar Bank Link status * : Select

Name * : Ashish Manoharrao Borkar

Date of Birth (As per Aadhaar) * : 1986-08-07

Age * : 39

Gender * : Male

Email ID * : Email ID [Verify]

Mobile Number * : Mobile Number [Verify]

APAAR ID : APAAR ID

Applicant full Name (As per SSC Marksheet / L.C.) * : Applicant full Name (As per SSC Marksheet / L.C.)

Religion * : Select

Caste Category * : Select

Caste * : Select

Caste Certificate Number * : Caste Certificate Number [Fetch]

Caste Certificate : Choose File No file chosen

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Are you Domicile of Maharashtra / Maharashtra-Karnataka Border? * : Yes

Domicile Certificate Number * : Domicile Certificate Number [Fetch]

Domicile Certificate : Choose File No file chosen [Upload]

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

## Family Income Details

Family Annual Income *

Family Annual Income

Do you have Non-Creamy Layer Certificate? *

Yes

Upload Non-Creamy Layer Certificate

Choose File | No file chosen | Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Income Certificate Number *

Income Certificate Number | Fetch

Income Certificate

Choose File | No file chosen | Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

## Disability Details

Disability of any Type? *

Select

## Parent/Guardian Details

Is either parent alive? *

Yes

Father Name *

Father Name

Mother Name *

Mother Name

Parent's/Guardian Mobile No. *

Parent's/Guardian Mobile No. | Verify

## Address Details

Address *

S/O Manoharrao Borkar, 156, behind ambedkar hostel, Hinganghat, W

State *

Maharashtra

District *

Wardha

Taluka

Hinganghat

Village

SHAHAPUR

Pincode *

442301

## Current Course Details

### Current Course Information

Admission Year In Current Course *
Select

Institute State *
Select

Institute District *
Select

Institute Taluka *
Select

Qualification Level *
Select

Stream *
Select

College Name / School Name *
Select

Course Name *
Select

Admission Type *
Select

Year Of Study *
Select

Admission Date *
dd-mm-yyyy

Fees Paid *
Fees Paid

Is it a Professional course? *
Select

Is Admission Through Open Or Reserved Category ? *
Select

Gap Years *
Gap Years

## Past Qualification Details

### Past Qualification Information

+ Add Another Past Qualification Information

Past Qualification Information #1

Is your previous High School / College / Institute in Maharashtra? *
Select

Institute State *
Select

Institute District *
Select

Institute Taluka *
Select

Qualification Level *
Select

Stream *
Select

College Name / School Name *
Select


Course *
Select

Board/University
Select

Passing Year *
Select

Xth percentage *
Enter xth percentage

Upload Marksheet
Choose File No file chosen Upload
Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)



**Other Details**

**Accommodation/Hostel Details**

Beneficiary Category *

Select

**Other Scholarship Details**

Did you avail any other scholarship / stipend for the current academic year? *

Yes

Name of scholarship scheme *

**Additional Personal Details**

Is taking benefit of TFWS (Tuition Fee Waiver Scheme)? *

Select

Is admitted under EWS seat? *

Select

Domicile Certificate of Karnataka


Choose File | No file chosen | Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Leaving Certificate / Transfer Certificate

Choose File | No file chosen | Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)



**Additional Declaration**

- I confirm that my Aadhaar seeded account is NOT a 'Jan Dhan' account and no credit limit is applicable on the account.
- I confirm that my Aadhaar seeded bank account is active
- I confirm that my family has not availed benefits under any Government scholarship / hostel scheme(s) for more than 2 children.
- I confirm that I have applied for and availed the scholarship benefit from the Government for not more than 1 Scholarship / Freeship scheme and 1 accommodation scheme (as applicable).
- I hereby declare that, where family income is an eligibility criteria for the scholarship, I shall be solely responsible for promptly informing the concerned Institute of study and the respective Department in writing if my family income exceeds the prescribed threshold of INR 2.5 lakh or INR 8 lakh, as applicable, at the time of renewal of scholarship. I understand that failure to disclose such changes may render me ineligible for the scholarship and may attract recovery of benefits and any other action as per applicable rules.
- I confirm that I am the first / second child in the family availing this scholarship and not more than 2 children are availing / will have availed this scholarship in total.

☐ **I have read and agree to this declaration.**

Cancel | Save As Draft | Preview Application | Submit Application